RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ७, अंक ९८(२)] सोमवार, ऑक्टोबर २५, २०२१/कार्तिक ३, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १८९**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक २२ ऑक्टोबर २०२१.

**अधिसूचना**

**प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९.**

क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१३०/पदुम-४.—प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगांस प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९ (२००९ चा अधिनियम क्र. २७) याच्या कलम ६ च्या पोट-कलम (१) आणि ( २) तसेच कलमे ७,११,१२ व १३ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, ज्यामुळे गोजातीय (गुरे व म्हशी), शेळी ( बकऱ्या) मेंढी (मेंढ्या) आणि वराह (डुकरे) या प्रजातीच्या प्राण्यांना (यात यापुढे ज्यांचा निर्देश " बाधित गोजातीय, शेळी, मेंढी व वराह या प्रजातीचे प्राणी " असा केला आहे) लाळ-खुरकुत रोगाचा प्रादुर्भाव होतो अशा उक्त अधिनियमान्वये अनुसूचित रोग असल्याचे घोषित केलेल्या " लाळ-खुरकुत " रोगाच्या बाबतीत,—

(क) लाळ-खुरकुत रोगावर नियंत्रण, प्रतिबंध किंवा त्याचे निर्मूलन करता यावे आणि गुरे, म्हशी, शेळी, मेंढी व वराह या प्रजातींचे प्राणी, ज्या ठिकाणी ते ठेवलेले आहेत, त्या ठिकाणापासून अन्य कोणत्याही ठिकाणी किंवा उक्त नियंत्रण क्षेत्राबाहेर नेण्या-आणण्यास मनाई करता यावी; आणि

(ख) कोणत्याही व्यक्तीस, उक्त बाधित गोजातीय, शेळी, मेंढी व वराह या प्रजातीचे जिवंत अथवा मृत प्राणी, कोणत्याही उक्त बाधित झालेल्या गोजातीय, शेळी, मेंढी व वराह या प्रजातींच्या प्राण्यांच्या संपर्कात आलेली कोणत्याही प्रकारची वैरण, किंवा अन्य साहित्य आणि अशा प्राण्यांच्या शवावरील, कातडी किंवा इतर कोणताही अवयव किंवा प्राण्यांपासूनचे अन्य कोणतेही उत्पादन नियंत्रित क्षेत्रामधून बाहेर नेण्यास मनाई करता यावी; आणि

(ग) बाधित गोजातीय, शेळी, मेंढी व वराह या प्रजातींच्या प्राण्यांचा कोणताही बाजार भरवणे, प्राण्यांच्या शर्यती लावणे, प्राण्यांची जत्रा भरवणे, प्राण्यांचे प्रदर्शन आयोजित करणे आणि नियंत्रण क्षेत्रात गोजातीय, शेळी, मेंढी व वराह प्रजातीच्या प्राण्यांचे गट करून किंवा त्यांना एकत्रित करून अन्य कोणतेही काम पार पाडणे यास मनाई करता यावी; आणि

(घ) उक्त बाधित झालेल्या गोजातीय, शेळी, मेंढी व वराह या प्रजातींच्या प्राण्यांना उक्त नियंत्रित क्षेत्रामधील बाजारपेठेत, जत्रेत, प्रदर्शनामध्ये किंवा प्राण्यांच्या अन्य जमावामध्ये किंवा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी आणणे किंवा आणण्याचा प्रयत्न करणे, यांस मनाई करता यावी, म्हणून महाराष्ट्र राज्यातील पुणे व अहमदनगर या जिल्ह्यांना नियंत्रित क्षेत्र (यात यापुढे ज्याचा निर्देश, “ नियंत्रित क्षेत्र” असा केला आहे) म्हणून घोषित करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**जगदीश गुप्ता,**
शासनाचे प्रधान सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg, Mantralaya Anex,
Mumbai 400 032, dated 22nd October, 2021.

*NOTIFICATION*

PREVENTION AND CONTROL OF INFECTIOUS AND CONTAGIOUS DISEASES IN ANIMALS ACT, 2009.

No. Sankirna-2021/C.R.130/ADF-4.— In exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 6 read with sections 7, 11, 12 and 13 of the Prevention and Control of Infectious and Contagious Diseases in Animals Act, 2009 (27 of 2009), the Government of Maharashtra, hereby declares the Districts Pune and Ahmednagar in the state of Maharashtra, as a controlled area (herein referred to as the " controlled area "), in respect of the Foot and Mouth Disease, which is a scheduled disease declared under the said Act, whereby the Bovine species (Cattles & Buffaloes), Caprine (Goats), Ovine (Sheep) and Porcine (Pigs) species animals are infected (hereinafter referred to as the " infected Bovine, Caprine, Ovine and Porcine species animals "); so as to ,–

(*a*) control, prevent or eradicate Foot and Mouth Disease and prohibit the movement of Cattles, Buffaloes, Sheep, Goats and Pigs from the place where they are kept to any other place within or outside the controlled area; and

(*b*) prohibit a person to take any infected Bovine, Caprine, Ovine and Porcine species animals alive or dead any kind of fodder bedding or other material which has come into contact with any infected Bovine, Caprine, Ovine and Porcine species animals and the carcass skin or any other part or product of such animal out of the controlled area; and

(*c*) prohibit holding or any animal market, animal races, animal fare, animal exhibition of the infected Bovine, Caprine, Ovine and Porcine species animals; and also to carry on any other activity involving grouping or gathering of Bovine, Caprine, Ovine and Porcine species animals in the controlled area; and

(*d*) Prohibit to bring or attempt to bring said infected Bovine, Caprine, Ovine and Porcine species animals into market, fair, exhibition or other congregation of animals or to any public place in the controlled area.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

JAGDISH GUPTA,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.